# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

एम.आय.डी.सी.रोड , कॉम्पलेक्स , गडचिरोली – ४४२६०५. (०७१३२–२२३३२२, २२३३२४)

ईमेल – bcud.gondwanauniversity@gmail.com


## जाहिरात

**नविन महाविद्यालय व विस्तारांसाठी प्रस्ताव २०१६–१७**

**(गोंडवाना विद्यापीठाचा बृहत आराखडा)**

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता सुचित करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२(१) अंतर्गत सत्र २०१६–१७ ते २०१८ – १९ या दोन वर्षांकरिता विद्यापीठाचा **बृहत आराखडा** (Perspective Plan) सुधारीत झालेला असून सदर बृहत आराखडयानूसार शैक्षणिक संस्थाना सत्र २०१६–१७ या वर्षाकरिता नविन महाविद्यालय, नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा, विषयवाढ, अतिरिक्त तुकडी इत्यादींसाठी प्रस्ताव सादर करण्याकरिता त्यांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२(३) मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या शुल्कासह **दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१५ च्या संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावा.** या संबंधीची माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळ **www.unigug.org** व **www.gondwana.digitaluniversity.ac** वर उपलब्ध आहे.

संस्था/महाविद्यालयांनी अर्जासाठी नोंदणी करण्याच्या आधी **वित्त व लेखा विभागातुन** रू. १०५०/– भरून बृहत आराखडा विकत घेणे तसेच अर्ज प्रक्रिया शुल्क रू. १६००/– भरणे अनिवार्य आहे. दोन्ही पावत्या सोबत ठेवुन विद्यापीठाच्या **www.unigug.org** या वेबसाईटवरील **Apply New College / Extension** या Link वरून ID व Password साठी अर्ज करावा व सदर अर्जाची स्वाक्षरी केलेली प्रत व शुल्क भरलेल्या पावत्या जोडून संगणक विभागातून ID प्राप्त करून घ्यावा. विद्यापीठाने ठरविलेले प्रस्ताव आवेदन शुल्क भरून सदर ID व Password वरून ऑन लाईन पध्दतीने **'परिशिष्ट अ, ब, क व ड व प्रपत्र** भरावेत व भरलेल्या अर्जाची Hard Copy घेवून **शासननिर्णय दि. २ सप्टेंबर २०१३** मधील **परिशिष्ट ब , क व ड** मधील कागदपत्रे अर्जासोबत क्रमवार पध्दतीने प्रस्तावासोबत जोडून व संस्थांमध्ये असलेल्या सोयी सुविधांचे व कर्मचारी/शिक्षक यांच्या विषयीचे चित्रीकरण असलेली सि.डी. सह सहा प्रतीत Hard व Soft Copy मध्ये **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ विभागात** प्रस्ताव सादर करावे. परंपरागत व व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी वेगवेगळे अर्ज सादर करावे. **बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी व अभ्यासक्रमासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत.** याउपरही अर्जदारांनी अर्ज केल्यास प्रस्ताव आवेदनाची रक्कम परत मिळणार नाही. बृहत आराखडा विद्यापीठात **०५ आक्टोंबर २०१५** पासून कार्यालयीन वेळेत मिळेल.

सर्व संस्थाधारकांना व महाविद्यालयातील प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णय क्र. एनजीसी–२०१०/(१९३/१०)/मशि–४, दि. ३० आक्टोंबर, २०१० व शासन निर्णय क्र. एनजीसी–२०१२/(२४७/१२)/मशि–४, दि. २ सप्टेंबर, २०१३ चे काळजीपूर्वक वाचन करून शासनाने दिलेल्या सुचना/निर्देशानुसारच अर्ज सादर करावेत.

संस्थेने/महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची त्रृटी आढळून आल्यास संबंधित संस्थेने/महाविद्यालयाने सादर केलेला अर्ज शासनाकडे शिफारस न करता संबंधितांना परत पाठविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(टिप : बृहत आराखड्यानुसार ज्या ठिकाणी शासनाकडुन महाविद्यालय मंजूर झाले असतील किंवा मंजूर होतील त्या ठिकाणी नविन महाविद्यालयाकरिता शासनाकडे शिफारस करता येणार नाही. तसेच शासन स्तरावरून प्रस्ताव मागविण्यासंदर्भात काही सुचना व अटी प्राप्त झाल्यास जाहीरात रद्द व फेरबदल करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.)**

(डॉ. विनायक इरपाते)

कुलसचिव

गोंडवाना विद्यापीठ , गडचिरोली.

// गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ

*महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ*

**डॉ. एस. एम. रोकडे**
संचालक (प्र.)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२ फॅक्स रू ०७१३२.२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@gmail.com
**web:**gondwana.digitaluniversity.ac , www.unigug.org

क्र/गों.वि./बी.सी.यु.डी./ **370 / 2015** दिनांक : **30 / 09 / 2015**

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक,
शैक्षणिक सत्र २०१६–१७ साठी अर्ज करणारे
संस्था / महाविद्यालय.

विषय :– शैक्षणिक सत्र २०१६ – १७ करिता नविन महाविद्यालय, नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी इ. साठी प्रस्ताव दाखल करणाऱ्या संस्था/ महाविद्यालयांना ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया व मार्गदर्शक सुचना.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०१६–१७ करिता नविन महाविद्यालय, नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी इ. साठी प्रस्ताव दाखल करू इच्छिणाऱ्या संस्था/महाविद्यालयांना बृहत आराखडा, शासन निर्णय दि. ३० आक्टोंबर २०१० व दि. २ सप्टेंबर २०१३ व सोबत जोडलेल्या ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया व मार्गदर्शक सुचनांचे पालन करून विद्यापीठात प्रस्ताव दाखल करावयाचा आहे.

बृहत आराखडा, शासन निर्णय व प्रस्ताव संबंधातील मार्गदर्शक सुचनांचे पालन न करणाऱ्या संस्था/महाविद्यालयांचे अर्ज स्विकारले जाणार नाही अथवा अपात्र करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

सहपत्र :– बृहत आराखडा, शासन निर्णय व मार्गदर्शक सुचना.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

// गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ )

*महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ*

डॉ. एस. एम. रोकडे
संचालक (प्र.)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२,२२३३२४ फॅक्स : ०७१३२.२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@ gmail.com
**web :** gondwana.digitaluniversity.ac , www.unigug.org

## नविन महाविद्यालय, नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा, विषयवाढ, अतिरीक्त तुकडी इ. साठी प्रस्ताव सादर करण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने करावयाची प्रक्रिया व मार्गदर्शक सूचना.

१. परंपरागत व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी वेगवेगळे प्रस्ताव अर्ज सादर करावेत.

२. संस्था/महाविद्यालयांनी अर्जासाठी नोंदणी करण्याच्या आधी **वित्त व लेखा विभागातुन** रू. १०५०/– भरून बृहत आराखडा विकत घेणे तसेच अर्ज प्रक्रिया शुल्क रू. १६००/– भरणे अनिवार्य आहे. दोन्ही पावत्या सोबत ठेवुन विद्यापीठाच्या **www.unigug.org** या वेबसाईटवरील **Apply New College / Extension** या Link वरून ID व Password साठी अर्ज करावा व सदर अर्जाची स्वाक्षरी केलेली प्रत व शुल्क भरलेल्या पावत्या जोडून संगणक विभागातून ID प्राप्त करून घ्यावा.

३. ज्या संस्थांना/महाविद्यालयांना नविन महाविद्यालय, नविन अभ्यासक्रम, नविन विद्याशाखा, विषयवाढ, अतिरीक्त तुकडी इ. साठी प्रस्ताव द्यावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाने ठरविलेले प्रस्ताव आवेदन शुल्क भरावे. आवेदन शुल्क मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या नावाने डी. डी. द्वारे भरावे लागेल.

४. विद्यापीठाचे संकेतस्थळ www.unigug.org वर उपलब्ध असलेल्या परिशिष्ट अ,ब,क,ड व प्रपत्रामध्ये ऑन लाईन पद्धतीने संस्थेने विस्तृत माहिती भरणे बंधनकारक आहे.

५. बृहत आराखड्यामध्ये जोडलेल्या शासन निर्णय दि. ०२ सप्टेंबर २०१३ मधील परिशिष्ट ब, क, ड मध्ये दर्शविल्यानुसार आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून PDF Format मध्ये संस्थेनी अपलोड करावेत.

६. अर्जासोबत शासन निर्णय दि. ०२ सप्टेंबर २०१३ च्या 'परिशिष्ट ब, क, ड मध्ये दर्शविलेले सर्व कागदपत्रे मुळ प्रतींची फाईल व इतर (०५) फाईल असे एकूण ०६ फाईल्समध्ये साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करावा. सर्व फाईलमधील कागदपत्रे एक समान असावी.

७. संस्था/महाविद्यालयांनी दि. ३१ आक्टोंबर २०१५ पर्यत ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा. ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट घेवुन, स्कॅन केलेले आवश्यक ते सर्व कागदपत्रे जोडून प्रस्ताव शुल्कासहित सहा प्रतीत व सी.डी. मध्ये Hard व Soft Copy (Physical Submission) सह दि. ०२/११/२०१५ ला संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ विभागात प्रस्ताव सादर करावा.

८. बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय न काढण्याबाबतचे बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र **बँकेच्या लेटर हेडवर** असलेलेच ग्राह्य धरण्यात येईल.

९. शासन निर्णय **दि. ०२ सप्टेंबर २०१३** च्या 'परिशिष्ट ब, क, ड' मधील सादर करावयाचे हमीपत्र रू. १००/— च्या स्टॅप पेपरवर **नोंदणीकृत** करून प्रस्तावासोबत जोडण्यात यावीत.

१०. प्रस्तावासोबत जोडण्यात येणारी कागदपत्रे स्वयं स्पष्ट दिसणारी असावीत व संस्थेच्या अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांनी साक्षांकित केलेली असावीत.

११. शासन निर्णय **दि. ०२ सप्टेंबर २०१३** मध्ये नमुद केल्यानुसार प्रस्तावासोबत संस्थेनी ज्या ठिकाणी महाविद्यालयाची मागणी केलेली आहे तेथील इमारत स्वत:ची असल्यास संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे अथवा भाड्याची असल्यास भाडे पत्र करारनामा दुय्यम निबंधक कार्यालयाकडून नोंदणीकृत करून पुराव्यासहित प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे. करारनामामध्ये सर्व्हे नंबर, घर क्रमांक, इमारतीचा नकाशा, खोली क्र., खोल्यांचे विवरण व एकूण क्षेत्रफाळांसहित स्पष्टपणे नमुद असणे अत्यावश्यक आहे. नोटरी किंवा प्रतिज्ञापत्र स्विकारले जाणार नाहीत.

१२. अर्जासोबत संस्थेने भरलेल्या प्रस्ताव शुल्काची मुळ प्रत प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक असून सदर प्रत न जोडणाऱ्या संस्थेचा अर्ज अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१३. प्रस्तावासोबत दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन नोंदणीकृत जागेची कागदपत्रे व अद्यावत ७/१२ जोडणे अत्यावश्यक आहे. 'परिशिष्ट ब' मध्ये दर्शविल्यानूसार 'अ,ब,क' वर्ग महानगरपालीका क्षेत्रासाठी १/२ एकर **अकृषक**, 'ड' महानगरपालीका व नगरपालीका क्षेत्रासाठी किमान ०१ एकर **अकृषक** व उर्वरीत सर्व क्षेत्रासाठी किमान ०३ एकर **अकृषक जागा** असणे बंधनकारक आहे. जागेचा अकृषक असल्याचा एन.ए. आदेश प्रस्तावासोबत जोडावा. जागा अपुरी असल्यास संस्थेचा प्रस्ताव अपात्र केल्या जाईल. भाड्याची /लीजची जागा असल्यास करारनामा दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन नोंदणीकृत असावा. नोटरी किंवा प्रतिज्ञापत्र स्विकारले जाणार नाहीत. सदर जागा अकृषक केलेली असणे बंधनकारक आहे.

१४. संस्थेनी नविन महाविद्यालयासाठी मागणी केलेल्या शहरातील/गावातीलच स्थानिक जागा असणे बंधनकारक आहे व त्यानुसार जागेचा ७/१२ किंवा भाडे कराराची **नोंदणीकृत** कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडावी. इतरत्र ठिकाणाचे जागेची कागदपत्रे सादर केल्यास प्रस्ताव अपात्र करण्यात येईल.

१५. अर्ज करणाऱ्या संस्था/महाविद्यालयांनी त्यांचे यापूर्वी अस्तीत्वात असलेल्या महाविद्यालयातील मान्यता प्राप्त प्राचार्य व प्राध्यापकांची यादी व विद्यापीठाचे मान्यता पत्रासह प्रस्तावाला जोडण्यात यावी.

१६. अर्ज करणाऱ्या संस्था / महाविद्यालयांनी त्यांचे अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयातील नॅक/एनबीए मूल्यांकन अथवा पूर्नमूल्यांकन असणे आवशयक आहे. सदर मुल्यांकन/पुर्नमुल्यांकनाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे अत्यावश्यक आहे.

१७.पदव्युत्तर अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरू करण्यासाठी महाविद्यालयाला सुरू होऊन ५ वर्षे पूर्ण झालेली असली पाहीजे. पदव्युत्तर विषय सुरू करण्यासाठी सदर विषयातील पदवी विभागाची एक बॅच उत्तीर्ण झालेली असणे अत्यावश्यक आहे व त्या विषयासाठी मंजुर पदाच्या ५० टक्के पदे भरलेली असणे आवश्यक आहे किंवा प्रत्येक विषयासाठी किमान एक Faculty Member असणे आवश्यक आहे.

१८. संस्थेनी सादर केलेल्या अर्जात व कागदपत्रांमध्ये खोडतोड असल्यास सदर अर्ज स्विकारले जाणार नाही अथवा कोणत्याही टप्प्यात तसे दिसून आल्यास सदर अर्ज अपात्र केला जाईल याची नोंद घ्यावी.

१९. प्रस्तावातील प्रत्येक कागदाला पेज नं. देण्यात यावे. कागदपत्रे परिशिष्ट 'ब' प्रमाणे जोडावित. प्रस्तावाच्या सुरूवातीला अनुक्रमणिका (Index) केलेले असावे. 'परिशिष्ट ब' मध्ये अनुक्रमांनुसार कागदपत्रे कोणत्या पेज नंबर पासून कोणत्या पेज नंबर पर्यंत जोडले आहे, ते नमुद करावे.

२०. अपूर्ण असलेले / अपूर्ण भरलेले अर्ज विद्यापीठाद्वारे स्विकारण्यात येणार नाही.

२१. संस्थेनी नविन महाविद्यालय/नविन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषयवाढ/अतिरीक्त तुकडी इ. साठी दिलेल्या **प्रस्ताव व ३० नोव्हेंबरपुर्वी केलेली त्रृटी पूर्तता प्रस्तावातून शासन निर्णयातील कोणत्याही बाबी संदर्भातील त्रृटींची पूर्तता होत नसल्यास संस्थेचा अर्ज कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्याचे अधिकार विद्यापीठाचे राहील. त्याबाबत विद्यापीठाने घेतलेला निर्णय संस्थेस बंधनकारक राहील.**

२२. विद्यापीठाद्वारे **बी.सी.यु.डी. विभागातून संस्था/महाविद्यालयांना देण्यात आलेल्या ID वरच त्रृटी पूर्तता, पडताळणी समिती, पात्र व अपात्रतेसंबंधी सर्व माहिती विद्यापीठाद्वारे कळविण्यात येईल.** त्याकरिता संस्था/महाविद्यालयांनी नियमीतपणे विद्यापीठाने दिलेला ID तपासणे आवश्यक आहे. ID च्या व्यतिरीक्त पोस्टाने किंवा स्वतंत्ररित्या इतर कोणत्याही पद्धतीने अर्ज करणाऱ्या संस्था/महाविद्यालयांना कळविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२३. फॉर्म भरतांना काही तांत्रिक अडचणी आल्यास खालील हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावे.

०७१३२—२२३३२२, २२३३२४.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)